Email- hellobatmidar@gmail.com

दैनिक

# हॅलो बातमीदार

जळगाव

RNI NO. - MAHMAR/2023/85315

संपादक : सुमेध पद्माकर सोनवणे    कार्यकारी संपादक : प्राजक्ता तायडे मो.८५३०४८८२०३

वर्ष : ३ रे | अंक १६९ | शुक्रवार दि.२४ ऑक्टोबर २०२५ | पाने 4 | मुल्य रू.3

## थोडक्यात

### बाबासाहेबांचे आर्थिक आणि सामाजिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल – सरन्यायाधीश भूषण गवई



रत्नागिरी– मंडणगड येथे झालेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील रहाल. जेणेकरुन बाबासाहेबांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. गवई यांच्या हस्ते आज झाले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमृता जोशी, बार असोसिएशनचे अध्यक्ष अमोल सावंत, सदस्य संग्राम देसाई, वकील संघाचे अध्यक्ष मिलींद लोखंडे, आमदार किरण सामंत, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी मनुज जिंदल आदी उपस्थित होते.

### मुंबई महापालिका निवडणुकीत महायुती मात्र इतरत्र स्वतंत्र लढणार–मुख्यमंत्री



मुंबई : आगामी निवडणुकांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी वर्षा निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चेत मुंबई महापालिका निवडणुकीत महायुती होणार असल्याचे सांगत अन्य ठिकाणी महायुतीतील पक्ष स्वतंत्रपणे लढतील, असे स्पष्ट संकेत दिले आहेत. मतदार याद्यांमध्ये विरोधकांच्या मतदारसंघात त्यांनी केलेल्या घोळाचे पुरावे आम्ही जमा केले असून ते पुरावे आम्ही देऊ, अशा इशाराही यावेळी यावेळी दिला.निवडणूक आयोगाने मतदार याद्यांवर हरकती सूचना मागवल्या होत्या तेव्हा यांनी एकही हरकत का घेतली नाही, असा सवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना विचारला आहे. वर्षा निवासस्थानी पत्रकारांसोबत अनौपचारिक संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते.

### पियुष मन्यार यांचा कारनामा : कमरेला पिस्टल लावत 'दौलत' उधळली

जळगाव – जळगावातील पियुष मन्यार यांचा कमरेला पिस्टल लावून दौलत उधळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर जिल्हा पेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकाराची जिल्हाभरात चांगलीच चर्चा रंगली आहे.जळगाव पोलिस मुख्यालयातील 'पद्मालय पोलिस हॉल'मध्ये सोमवारी एका कार्यक्रमात पियुष मन्यार याने नागरिकांमध्ये दहशत व्हावी या हेतूने पिस्टल कमरेला लावून पैश्यांची उधळण केली. याचा व्हिव्हिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच जिल्हापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### गुंड निलेश घायवळचा पासपोर्ट अखेर रद्द : प्रादेशिक कार्यालयातून ऑर्डर जारी

पुणे : पुण्यातील कोथरूडमधील गोळीबारानंतर कुख्यात गुंड निलेश घायवळच्या अडचणी वाढल्या आहेत. गुंड निलेश घायवळ सध्या स्वित्झर्लंडला असून त्याने घायवळ ऐवजी गायवळ नावाचा वापर करत पासपोर्ट मिळवण्याचे यापूर्वीच पोलिस तपासात समोर आल्यानंतर आता त्याचा पासपोर्ट रद्द करण्यात आला आहे. पासपोर्ट प्रदेश कार्यालयातून याबाबतची ऑर्डर जारी झाली आहे. पुणे पोलिसांनी काही दिवसांपूर्वी न्यायालयात तसेच पासपोर्ट प्रादेशिक कार्यालयात घायवळ बाबत अहवाल सादर केला होता. पासपोर्ट रद्द झाल्याने निलेश घायवळच्या अडचणी वाढल्या आहेत. गुन्ह्याच्या संदर्भातील प्रतिज्ञापत्र आणि नावाच्या बाबत खोटी कागदपत्रे सादर करून गुंड नीलेश घायवळ याने अहिल्यानगर येथून पासपोर्ट मिळवला होता. त्याप्रकरणी पुणे पोलिसांनी अहिल्यानगर पोलिस दलाली एका पोलिस निरीक्षकासह दोघांना नोटीस बजावली होती.

## पाचोरा भाजपतर्फे पत्रकार बांधवांसाठी दिवाळी शुभेच्छा व फराळ कार्यक्रमाचे आयोजन

पाचोरा प्रतिनिधी शेख जावीद)



भारतीय जनता पक्ष, पाचोरा शहराच्या वतीने पत्रकार बांधवांसाठी दिवाळी शुभेच्छा व फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजातील चौथा स्तंभ म्हणून कार्य करणाऱ्या पत्रकार बांधवांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि सणाच्या निमित्ताने सौहार्दाचे वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. पाचोरा शहरातील प्रतिष्ठित पत्रकार, स्थानिक वृत्तसंस्थांचे प्रतिनिधी, भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमास माजी आमदार दिलीपभाऊ वाघ, युवा नेते अमोलभाऊ शिंदे, जिल्हा परिषद सदस्या वैशालीताई सुर्यवंशी, माझे माझी नगराध्यक्ष संजयनाना वाघ, ज्येष्ठ कार्यकर्ते सदाशिव आबा, मधुभाऊ काटे, डी. एम. पाटील, प्रकाश पाटील, वासुअण्णा महाजन, शिवदास पाटील, नंदुबापु सोमवंशी, दिपक माने, भोलाआप्पा चौधरी, योगेश ठाकूर, सुदाम पाटील, सुभाष पाटील आणि प्रदीप पाटील हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वरूप साधे, पण उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी आमदार दिलीपभाऊ वाघ, अमोलभाऊ शिंदे आणि वैशालीताई सुर्यवंशी यांनी सर्व पत्रकार बांधवांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी पत्रकारांच्या कार्याचे विशेष कौतुक करत, त्यांच्या सामाजिक जबाबदारीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. दिलीपभाऊ वाघ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पत्रकार समाजातील खरी जनभावना सरकार आणि प्रशासनापर्यंत पोहोचवतात. त्यांच्या प्रामाणिक कार्यामुळे लोकशाही अधिक सक्षम बनते. दिवाळीच्या या सणानिमित्त आपण सर्व पत्रकार बांधवांना कृतज्ञतेचा नमस्कार करतो. अमोलभाऊ शिंदे यांनीही आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, पत्रकार म्हणजे समाजाचे आरसे आहेत. ते केवळ बातम्या देत नाहीत, तर समाजातील वास्तव उभे करतात.अशा बांधवांसोबत सण साजरा करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे त्यांनी पुढे सांगितले की, पाचोऱ्यातील पत्रकार समाजाचे हित डोळ्यासमोर ठेवून निर्भीडपणे काम करत आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे. वैशालीताई सुर्यवंशी यांनीही उपस्थितांना शुभेच्छा देत सांगितले की, भाजप नेहमीच सर्व समाजघटकांशी समरस होऊन कार्य करण्यावर विश्वास ठेवतो. पत्रकार हे त्या प्रयत्नांचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या माध्यमातून समाजातील सकारात्मकता आणि विकासाची दिशा पुढे जाते कार्यक्रमात उपस्थित सर्व पत्रकार बांधवांचे फुलांच्या गुच्छांनी स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी दिवाळीच्या पारंपरिक फराळाचा सर्व उपस्थितांनी एकत्र आनंद घेतला. चिवडा, लाडू, करंजी, शेव यांसारख्या पारंपरिक पदार्थांच्या सुवासाने वातावरण अधिक सणाविशेष झाले होते. स्नेह, आपुलकी आणि सणाचा आनंद यांचा सुंदर संगम या कार्यक्रमात पाहायला मिळाला. या प्रसंगी भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, दिवाळीचा सण हा केवळ आनंद साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, तो परस्पर स्नेह व सामाजिक बांधिलकीचा संदेश देतो. पत्रकार बांधवांसोबत दिवाळी साजरी करणे म्हणजे समाजातील एका महत्त्वाच्या घटकाला आदर अर्पण करणे. कार्यक्रमाचे आयोजन शहर भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी संयोजितपणे केले होते. सर्वांनी एकत्र येऊन दिव्यांनी सजवलेल्या कार्यालयात सणाचा आनंद साजरा केला. कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवर, पदाधिकारी आणि पत्रकार बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत स्नेहभावाने संवाद साधला. एकूणच, पाचोरा भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित पत्रकार बांधवांसाठीचा दिवाळी शुभेच्छा व फराळ कार्यक्रम हा केवळ सण साजरा करण्याचा नव्हे, तर आपुलकी, कृतज्ञता आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश देणारा ठरला आहे

## साकळी–दहिगाव गटात नवा राजकीय भूचाल! विकास प्रथम पॅनलची एन्ट्री;

## पारंपरिक पक्षांच्या समीकरणात उलथापालथ

उपसंपादक : मिलिंद जंजाळे

यावल तालुक्यातील राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरत असलेल्या साकळी–दहिगाव गटात येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत मोठा भूकंप घडविणारी हालचाल सुरू झाली आहे. पारंपरिक राजकीय गोटांना चकित करत, एक आगळं–वेगळं पॅनल रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहे. या नव्या पॅनलची एन्ट्री होताच सर्वच पक्षांमध्ये खळबळ माजली आहे. या पॅनलचा मुख्य मंत्र आहे – विकास प्रथम, राजकारण नंतर! गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करत नव्या पॅनलचे सूत्रधार गावोगावी विकासाचा नवा आराखडा घेऊन जनतेसमोर जाणार आहेत. रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि तरुणांना रोजगार या ठोस मुद्द्यांवर आधारलेली भूमिका या गटाची असणार असल्याची माहिती मिळते. विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, या पॅनलकडून तरुण आणि सक्षमीकरणासाठी तत्पर असलेल्या व्यक्तींना उमेदवारी दिली जाणार आहे. त्यामुळे पारंपरिक उमेदवारांची गणिते कोलमडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या काही निवडणुकांत एकाच गोटांनी आपले वर्चस्व टिकवले असले, तरी या नव्या पॅनलच्या आगमनाने समीकरणे पूर्णतः बदलण्याची चिन्हे आहेत. जनतेचा विकास आणि गावांचा उत्थान हा घोषवाक्य घेऊन हे पॅनल मैदानात उतरणार असल्याने साकळी–दहिगाव गटातील निवडणूक अधिक रंगतदार होणार आहे. स्थानिक राजकीय वर्तुळात तर आता चर्चा रंगली आहे – नवे पॅनल – नवा बदल! या नव्या चळवळीमुळे कोणाचा किल्ला ढासळणार आणि कोण नव्या उमेदीने झेंडा फडकवणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपदी श्री दिनेश ताराचंद खैरे यांची निवड



पुणे –येथील नामांकित शिक्षण संस्था नौरोसजी वाडिया महाविद्यालयातील कार्यरत कर्मचारी, साहित्यिक, कवी श्री दिनेश ताराचंद खैरे यांना सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीची घोषणा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉक्टर शरद गोरे (सर )आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष शुभांगीताई काळभोर यांच्या स्वाक्षरीने दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आली. श्री दिनेश खैरे यांच्या नियुक्तीचा काळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत असणार आहे. साहित्यिक,कवी श्री दिनेश तारचंद खैरे यांनी ग्रामीण भागातील साहित्यिक चळवळीला चालना देत अनेक नवीन कवी ,लेखक आणि वाचक तयार केले आहेत. त्यांची दोन पुस्तके सुद्धा प्रकाशित झाली आहेत. मितभाषी, मृदू स्वभावाचे, सेवा कार्यतत्पर कवी लोकसाहित्यिक म्हणून सुपरिचित आहेत. सामाजिक सांस्कृतिक ,शैक्षणिक, अध्यात्मिक अशा सर्व क्षेत्रात त्यांचा वावर आहे. यापूर्वी त्यांना अनेक राज्यस्तरीय , राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच तसेच मराठी साहित्याचा प्रसार आणि नव्या पिढीत साहित्य प्रेम, वाचनाची आवड, नैतिक मूल्य जागवण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या माध्यमातून अधिक सक्रिय कार्य करणारा असल्याचे श्री दिनेश ताराचंद खैरे यांनी असे आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्या या नियुक्तीबद्दल कवी, साहित्यिक,सामाजिक कार्यकर्ते मित्रपरिवार आणि चाहत्यांकडून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## यावल नगरपालिकेच्या रणधुमाळीत काँग्रेसचा दमदार शिलेदार!

## प्रभाग क्रमांक १ मधून मनोहर बाबुराव सोनवणे करणार अनुजाती जागेवर उमेदवारी

उपसंपादक : मिलिंद जंजाळे

यावल नगरपालिकेची निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली असून, या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून काँग्रेस पक्षाकडून मनोहर बाबुराव सोनवणे हे उमेदवार म्हणून रिंगणात उतरणार असल्याची चर्चा सध्या शहरात जोरदार रंगली आहे. शांत, सय्यमी आणि कार्यतत्पर व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेल्या सोनवणे यांच्या उमेदवारीमुळे काँग्रेस पक्षात नवचैतन्य निर्माण झाले आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये मतदारांमध्येही सोनवणे यांच्या उमेदवारीबाबत उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. सोनवणे यांचे व्यक्तिमत्व जनतेशी घट्ट जोडलेले असून त्यांनी नेहमीच लोकहिताच्या प्रश्नांवर पुढाकार घेतला आहे, असे मतदार व्यक्त करत आहेत. मनोहर बाबुराव सोनवणे यांना राजकारणाचा समृद्ध अनुभव लाभलेला आहे. त्यांच्या पत्नीही यापूर्वी यावल नगरपालिकेत नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या, त्यामुळे या कुटुंबाचा



नगरपालिकेतील कारभाराचा अनुभव आणि जनसंपर्क दोन्ही मजबूत आहेत. स्थानिक स्तरावर सामाजिक कामात सक्रिय असलेले सोनवणे हे शांतपणे काम करणारे, परंतु जनतेच्या अडचणींसाठी लढा देणारे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या उमेदवारीमुळे काँग्रेसच्या पथकात नव्या उर्जेचा संचार झाला असून, विरोधकांसमोरही एक मजबूत आव्हान उभे राहिले आहे. राजकीय वर्तुळात सध्या चर्चा आहे की, प्रभाग क्रमांक १ मध्ये काँग्रेसचा हा उमेदवार मतदारांच्या मनात चांगला ठसा उमटवत आहे. येत्या निवडणुकीत मतदार कोणाच्या बाजूने झुकतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे, मात्र सध्याच्या घडीला मनोहर बाबुराव सोनवणे यांचे नाव मतदारांच्या चर्चेत अग्रस्थानी आहे!

## संपादकीय

### सायबर गुन्हेगारीत ज्येष्ठांचा बळी

सायबर गुन्हेगारीत ज्येष्ठ नागरिक हे सध्या सर्वात सोपे लक्ष्य ठरत आहेत. त्यांच्या वयाचा, विश्वासाचा आणि एकटेपणाचा फायदा सायबर गुन्हेगार सहज उठवत आहेत.माहितीचा अभाव, एकटेपणा आणि डिजिटल साक्षरतेची कमतरता अशा कारणांमुळे ज्येष्ठ नागरिक ऑनलाइन फसवणुकीला सहज बळी पडतात. पुणे शहरातही नुकत्याच घडलेल्या अनेक प्रकरणांतून ही बाब उघड झाली आहे. शेअर बाजाराच्या आमिषाने फसविणे, बँक व विमा कंपनीच्या नावाखाली गंडा घालणे, डिजिटल अटक सारख्या पद्धतींनी ज्येष्ठांना भीती दाखवली जात आहे.

शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिक इंटरनेट, स्मार्ट फोन आणि ऑनलाइन व्यवहारांचा वापर करतात. मात्र, त्यांना याच्या धोक्याबाबत पुरेशी माहिती नसते. ऑनलाइन व्यवहार करत असताना कोणती सावधानता बाळगायची याची पुरेशी कल्पना त्यांना नसते. विशेषत: बहुतेक ज्येष्ठ नागरिक एकटे जीवन जगत असतात. त्यांची मुले परगावी किंवा परदेशात नोकरीनिमित्त असतात. यामुळे त्यांना एकटेपणा जाणवत असतो. यामुळे ते ऑनलाइन फसवणुकीला सहजासहजी बळी पडतात.

सायबर गुन्हेगारांना ही बाब माहीत असल्याने ते ज्येष्ठ नागरिकांना सहजासहजी जाळ्यात अडकवतात. सायबर गुन्हेगार अनेकदा सरकारी अधिकारी असल्याचे भासवून ज्येष्ठ नागरिकांना घाबरवतात किंवा विश्वासात घेत त्यांच्याकडून हवी असलेली गोपनीय माहिती काढून घेतात. जसे की केवायसीच्या नावाखाली बँक खात्याची माहिती, मोबाइलवर आलेला ओटीपी आदी. तर काही वेळा त्यांना तुमच्या मोबाइलचा गैरवापर केला गेला आहे वा तुमच्या नावाने पाठवलेल्या पार्सलमध्ये अमलीपदार्थ सापडले आहेत असे भासवून घाबरवतात व पैसे उकळतात.

मध्यंतरी महावितरणकडून थकीत बिल न भरल्यास तातडीने वीजजोड तोडला जाईल अशी भीती दाखवत ज्येष्ठांना टार्गेट केले जात होते. तर गॅस कंपनींच्या नावाने केवायसीची ऑनलाइन मागणी केली जात होती. या प्रकरणांत भीतीपोटी पाठवलेल्या लिंक ओपन करून किंवा ओटीपी शेअर करून अनेक ज्येष्ठ नागरिकांनी लाखो रुपये गमावले होते. गॅस कंपन्या आणि महावितरणकडून जनजागृती झाल्यावर हे प्रकार कमी झाले. मात्र, यानंतर ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक प्रलोभने आणि सोप्या पद्धतीने जास्त पैसे कमवण्याचे आमिष दाखवून गुंतवणुकीच्या फसव्या योजनांमध्ये अडकवले जात आहे. सध्या तर डिजिटल अरेस्टचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढू लागले आहेत. यातही ज्येष्ठ नागरिक टार्गेट केले जात आहेत.

सोशल मीडिया किंवा मेसेजिंग ॲपवरून गुंतवणूक योजनांची अफवा पसरवून, प्रारंभिक लघु परतावा देऊन विश्वास मिळवतात. नंतर मोठ्या रकमेची मागणी करतात आणि अचानक गायब होतात. विशेषतः शेअर बाजारातील गुंतवणुकीचे आमिष दाखवून असे प्रकार घडत आहेत. अनेकांना शेअर मार्केटबद्दल माहिती नसते, मात्र तरीही ते अशा फसव्या जाहिरातींना बळी पडून लाखो रुपये गमवत आहेत. यामध्ये अनेकांनी आयुष्याची पुंजी गमावली आहे. सायबर पोलिसांच्या मते, तुम्ही स्वत: शेअर मार्केटचा अभ्यास करून स्वत:चे खाते उघडून गुंतवणूक केली तरच ती सुरक्षित असते.

बनावट कॉल व संदेश तसेच बँक अधिकारी, विमा प्रतिनिधी किंवा सरकारी कर्मचारी असे ढोंग करून केवासी, ओटीपी किंवा कार्ड तपशील मागवला जात आहे. बहुतेक वेळा तत्काळ पैसे भरा असा तगादा लावला जातो. समोरच्या व्यक्तीला विचार करण्यासाठी किंवा इतरांचा सल्ला घेण्यासाठी वेळही दिला जात नाही. समोरच्या सायबर गुन्हेगाराच्या दबावाखाली ज्येष्ठ नागरिक भांबावून जातात. ते त्याच्या इतक्या आहारी पडतात की समोरचा सांगेल तसे करण्यास तयार होतात. काही घटनांमध्ये तर ज्येष्ठ नागरिकांनी स्वतःच्या मुदत ठेवी मोडून सायबर भामट्यांना ऑनलाइन पैसे दिले आहेत. डिजिटल अटकेत तर पीडिताला अमली पदार्थ तस्करी, मनी लाँडरिंगसारख्या प्रकरणांत दोषी ठरल्याचे खोटे सांगून भीती दाखवतात. पीडिताला कॅमेर्‍यासमोर ठेवून धमकी देऊन ताबडतोब पैसे मागतात.

सायबर चोरटे सतत नवे तंत्र अवलंबत आहेत; परंतु त्यांचे बळी होण्यापासून वाचण्यासाठी जागरूकता, कुटुंबाचा आधार आणि तंत्रज्ञानाची माहिती आवश्यक आहे. पुणे शहरातील उघडकीस आलेली अनेक प्रकरणे आपल्याला हे स्पष्ट करतात की सायबर सुरक्षा ही फक्त तंत्रज्ञानाशी निगडीत नाही तर सामाजिक व शैक्षणिक समस्याही आहे. ज्यावर सरकार, पोलीस, स्थानिक संस्था आणि कुटुंब एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे.डिजिटल साक्षरता व जनजागृती : स्थानिक मंडळे, सामाजिक संस्थांद्वारे नियमित प्रशिक्षण वर्ग आणि वर्कशॉप चालवावेत. कुटुंबाने वृद्ध सदस्यांशी ऑनलाइन व्यवहारावर चर्चा करावी; कोणतीही आर्थिक विनंती किंवा अनोळखी लिंक फरक न करता कुटुंबाशी शेअर करावी. कोणत्याही कॉलवर ओटीपी, पीन नंबर, कार्ड तपशील सांगू नयेत. बँक कधीही अशी माहिती फोनवर विचारत नाही. फसवणूक झाली तर त्वरित बँकेशी संपर्क करणे, तातडीने एटीएम कार्ड ब्लॉक करणे, सायबर पोलीस/स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवणे आणि नॅशनल सायबर क्राइम पोर्टलवर (लूलशीलीळाश.सीं.ळप) तक्रार करणे. संशयास्पद कॉल/मेसेज/व्हॉट्सप चॅटसचे स्क्रीनशॉट सेव्ह करा; हे पोलीस तपासासाठी उपयुक्त ठरते. अज्ञात लिंक्सवर क्लिक करणे टाळणे, मजबूत आणि वेगवेगळे पासवर्ड वापरणे.४० हजार रुपयांपासून तब्बल दोन कोटी रुपयांपर्यंत रक्कम गमावलेल्या अनेक ज्येष्ठांना फसवणुकीनंतर फक्त आर्थिक धक्काच बसत नाही, तर कुटुंबीयांचा रोष, अपमान आणि नात्यांतील दुरावाही सहन करावा लागतो. सायबर फसवणुकीत विशेषतः सेक्सटॉर्शनच्या प्रकरणांमध्ये अडकलेल्या ज्येष्ठांना नातेवाईक आणि समाजात शरमेने मान खाली घालावी लागते. आपली आयुष्यभराची पुंजी गमावल्याने त्यांचे आर्थिक पाठबळ कोसळते आणि त्यातच मुलांशी नातेसंबंधही बिघडतात.

# शेतकऱ्यांच्या या अडचणींवर सरकारने गांभीर्याने उपाययोजना करा!

सध्या देशभर सर्वत्र दिवाळीचा सण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे पुन्हा एकदा सगळ्यांचे लक्ष गेले आहे. दिवाळीपूर्वी या शेतकऱ्यांच्या खात्यावर सरकारचा मदत निधी पोहोचेल असे सरकारतर्फे जोशात सांगितले गेले होते, पण प्रत्यक्षात हजारो शेतकऱ्यांना हे पैसे मिळालेच नाहीत. त्यामुळे ऐन दिवाळीत अनेक ठिकाणी शेतकरी आंदोलन करताना दिसत आहेत. या सगळ्या प्रकारावर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी एक चांगली उपरोधिक प्रतिक्रिया दिली आहे. दिवाळीपूर्वी सरकार शेतकऱ्यांना मदत पोहोचवू शकले नाही, त्यामुळे सरकारने आता एक स्वतंत्र जीआर काढून दिवाळीच पुढे ढकलली पाहिजे असे ते म्हणाले आहेत.

या सूचनेतला उपरोध लक्षात घेतला तर सगळी स्थिती लोकांच्या पटकन लक्षात येऊ शकते. आज लक्ष्मीपूजनाच्या दिवशी वर्धा येथे शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन सुरू झाले असून तेथे हजारो शेतकरी घरची दिवाळी सोडून रस्त्यावर उतरले आहेत. तिकडे छत्रपती संभाजी नगरात शेतकऱ्यांनी अर्धनग्न मोर्चा काढला. दुसरीकडे मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनीही आता शेतकऱ्यांसाठी आम्हाला रस्त्यावर उतरायची वेळ आली आहे असे म्हटले आहे. त्यांनीही सरकारकडून अद्याप कसलीही मदत न मिळाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रात जून ते सप्टेंबर या अवधित अनेक ठिकाणी पावसाने मोठी वाताहत झाली, त्यानंतर ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात तर मराठवाड्यासह राज्याच्या अन्य भागात अभूतपूर्व अतिवृष्टी झाली. मराठवाड्यात हाता तोंडाशी आलेले पीक तर वाहून गेलेच पण शेतकऱ्यांच्या जमिनीवरील माती सुद्धा खरवडून गेल्याने या जमिनी इतक्यात पीक घेण्याच्या लायकीच्या राहिलेल्या नाहीत. या सगळ्या भीषण परिस्थितीवर चारही बाजूनी टाहो फोडला गेला. मुख्यमंत्र्यांनीही दिल्ली दरबारी हजेरी लावून महाराष्ट्रासाठी अतिरिक्त मदत मिळवण्याचा प्रयत्न केला, पण केंद्राकडून पुरेसा निधी मिळाला नाही.

या आधीचा जो एक हप्ता मिळाला तो महाराष्ट्राला देय असलेल्या रकमेपैकीच होता आणि आता दुसरा एक नवीन हप्ता १५८६ कोटी रुपयांचा मिळाला आहे. त्या तुलनेत नुकसानीचा आकडा अतिप्रचंड आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकऱ्यांना एकूण ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे एकत्रीत पॅकेज जाहीर केले. हे पॅकेज ऐकून शेतकरी हुरळून गेले आणि दिवाळीपूर्वी हे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात पडतील असे सांगितले गेले पण या पॅकेजचा फोलपणाही नंतर उघडकीला आला. यातली बरीच मदत ही अंदाजपत्रकात जाहीर केलेल्या मदतीपैकीच असल्याचे लक्षात आले.

त्यातही सरकारने अशी मखलाशी केली की, ही मदत तातडीचा प्राथमिक टप्पा, मध्यवर्ती अंमलबजावणी आणि दीर्घकालीन अंमलबजावणी अशा तीन टप्प्यात केली जाणार असून ही मदत पुढच्या वर्षी मार्च महिन्यात पूर्ण होणार आहे असे सांगितले गेले. तातडीची मदत म्हणून जी रक्कम जाहीर झाली आहे ती आठ हजार कोटी रुपयांची आहे. त्यातून कुठे कुठे मदत पाठवली गेली, पण ती केवळ नाममात्र होती. मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त सात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ३६२ कोटी रुपयांचा अतिरिक्त मदत हप्ता पण जाहीर झाला पण आज दिवाळी निम्म्यावर संपत आली असतानाही शेतकऱ्यांच्या खात्यावर हे पैसे जमा झालेले नाहीत. त्यामुळे हवालदिल शेतकरी दिवाळी साजरी करू शकत नाही अशी परिस्थिती आहे.

काही ठिकाणी खाजगी दानशूर संस्था किंवा स्वयंसेवी संस्थांनी या आपदग्रस्ताना जुजबी मदतीचा हात दिला आहे. पण तेवढ्यावर भागणारे नाही किंवा तेवढ्या आधारावर शेतकऱ्यांनी दिवाळी साजरी करावी असेही म्हणता येणार नाही. वर नमूद केल्याप्रमाणे काही ठिकाणी मदत वाटप सरकारने सुरू केले आहे, पण ज्या तोकड्या शेतकऱ्यांच्या खात्यावर हे पैसे जमा झाले आहेत ते पैसे बँकांनी तांत्रिक कारणाने रोखून धरल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. अगदी बँक खात्याची केवायसी झाली नाही असले शुल्लक कारणही पुढे केले गेले आहे.

तुमची शेती कितीही असली आणि कितीही नुकसान झाले असले तरी तुम्हाला फक्त दोन हेक्टरच्या मर्यादेतच नुकसान भरपाई दिली जाणार आहे असे सरकारचा अध्यादेश म्हणतो. त्यावर आरडाओरड सुरू झाल्यानंतर विशेष बाब म्हणून तिसऱ्या हेक्टरचाही मदतीसाठी निर्णय घेण्यात आला. ज्या शेतीचे संपूर्ण नुकसान झाले आहे अशा ठिकाणी हेक्टरी २०००० रुपये आणि ज्या शेतीचे अंशतः नुकसान झाले आहे अशा ठिकाणी हेक्टरी दहा हजार रुपये या प्रमाणात ही मदत वितरित केली जाणार आहे. मात्र महाराष्ट्रापेक्षा छोटे राज्य असलेल्या पंजाब मध्ये तेथील शेतकऱ्यांना सरकारने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. किमान तेवढी तरी मदत महाराष्ट्रात मिळावी अशी मागणी सर्वच ठिकाणाहून झाली, पण सरकारने त्याला धूप घातली नाही.

ज्या शेतकऱ्यांना मदतीची आशा निर्माण झाली होती त्यापैकी असंख्य शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामेच झाले नाहीत. शेतकऱ्यांची जनावरे आणि कोंबड्या अनेक ठिकाणी वाहून गेल्या, त्या वाहून गेलेल्या जनावरांच्या पंचनामाचा आग्रह धरला गेला. पण ही वाहून गेलेली जनावरे दाखवायची कुठून असाही एक वेगळाच प्रश्न शेतकऱ्यांपुढे अनेक ठिकाणी निर्माण झाला. वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधीं पुढे बोलताना शेतकऱ्यांच्या या अडचणींवर सरकारने गांभीर्याने उपाययोजना करायला हवी.अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची अडचण सोसणारा शेतकरी आता मदत मिळवण्यासाठी येणाऱ्या अडचणीचा सामना करताना दिसत आहे. यात त्याची दिवाळी जवळपास वायाच गेली आहे. त्यामुळे ओमराजे निंबाळकर म्हणतात त्यानुसार आता सरकारने वेगळा जीआर काढून दिवाळीच, पुढे ढकलावी आणि तेवढ्या अवधीत तरी शेतकऱ्यांच्या खात्यावर मदत निधी जमा करून त्यांना मदतीचा हात द्यावा.

# संस्कृतीचा शाश्वत दीप



दिवाळी सणाच्या मागे हजारो वर्षांचा सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक वारसा दडलेला आहे. आजच्या युगात स्वरूप बदलले असले तरी आत्मा आजही तितकाच तेजस्वी आणि शाश्वत आहे.

जुन्या काळातील दिवाळी ही केवळ आनंदोत्सव नव्हती, तर ती जीवनशैलीचा अविभाज्य भाग होती. त्यात निसर्ग, श्रम, भक्ती आणि समाजभाव यांचा सुंदर संगम दिसून येत असे. 'दीपावली' या शब्दाचा अर्थ संस्कृतमधील 'दीप' म्हणजे दिवा आणि 'आवली' म्हणजे ओळ. म्हणजे दिव्यांची एक ओळ-दीपावली. इतिहास, पुराणे आणि ग्रंथांमध्ये या सणाचे विविध नावे आणि स्वरूप नोंदले आहे. जसे- यक्षरात्री, दीपमाला, दीपप्रतिपदुत्सव, दिवाळी, दीपिका, सुखरात्री, सुख सुप्तिका इत्यादी. पुराण, ज्योतिषशास्त्र आणि ऐतिहासिक ग्रंथांमध्ये या नावांचा उल्लेख आढळतो.

दिवाळीतील तिसरा दिवस लक्ष्मीपूजनाचा असतो. दिवाळीचा सर्वात तेजस्वी आणि मंगल दिवस. संध्याकाळी घराघरात दीपांच्या रांगा लागतात. मातीचे दिवे हे दिवाळीचे हृदय.

चौथा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा किंवा पाडवा. या दिवशी राजा बळीच्या स्मरणार्थ लोक आनंदोत्सव साजरा करतात. 'इडा पीडा जावो, बळीचं राज्य येवो' असे म्हणत शुभेच्छा दिल्या जातात. दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज. भावंडांच्या प्रेमाचे प्रतीक.

जुन्या काळातील ग्रामीण समाजात या सणाचा आणखी एक भावनिक पैलू होता. लग्नानंतर सासरी गेलेली नवविवाहित मुलगी दिवाळीची आतुरतेने वाट पाहत असे.

आपल्या भावाच्या पावलांची चाहूल लागली की तिच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू चमकत. भाऊ मोठ्या आपुलकीने बहिणीला माहेरी घेऊन येत असे. तिला साडी-चोळी, दागिने, भेटवस्तू देत असे. माहेरी आल्यावर ती आठ-पंधरा दिवस आई-वडिलांच्या कुशीत राहून आनंद लुटत असे. परत सासरी जाताना तिच्या डोळ्यांत पाणी असे, पण मनात भावाच्या प्रेमाचा प्रकाश झळकत असे. या सुंदर परंपरेत भावनांचे आणि संस्कारांचे जे चित्र दिसते, ते आजच्या पिढीने जपले पाहिजे.

पूर्वीच्या काळातील दिवाळी समाजातील एकोप्याचा आणि सामूहिक आनंदाचा उत्सव होती. शेजार्‍यांना गोडधोड पदार्थ देणे, एकत्र बसून दीपमाळा लावणे, गावात भजन-कीर्तन, हरिपाठ, लोकगीतं या सर्वांनी सामाजिक बांधिलकी मजबूत होत असे. गावातील चावडीवर दिवाळीच्या रात्री गप्पा, गोष्टी आणि हास्याचा गजर होत असे. लोक म्हणत, दिव्यांच्या प्रकाशात मन उजळावं. आज त्या ठिकाणी मोबाइलवरील शुभेच्छा संदेश आले आहेत, पण मानवी स्पर्श आणि आपलेपणा थोडा हरवला आहे.

महाराष्ट्रात दिवाळीची खास पद्धत आहे-घराची साफसफाई, रांगोळी, आकाशकंदील, फराळ, फटाके, अभ्यंगस्नान, नवविवाहित दांपत्यासाठी ओवाळणी, घरगुती आणि सामाजिक कार्यक्रम या सर्वांवर भर दिला जातो. मुलांनी मातीचे किल्ले तयार करणे, प्रदर्शने आयोजित करणे ही परंपरा राज्यभर प्रचलित आहे. दिवाळी अंक हा सांस्कृतिक वारसा ठरला आहे, ज्यातून साहित्य, कला आणि मनोरंजनाची परंपरा जपली जाते.

काळाच्या ओघात दिवाळीचे स्वरूप बदलले आहे. शहरीकरण, ग्लोबलायझेशन आणि उपभोक्तावादामुळे सणाचे बाह्यरूप अधिक भडक झाले आहे. रेडीमेड सजावट, इलेक्ट्रिक सीरियल लाइट्स, बाजारातून विकत घेतलेले पदार्थ, सोशल मीडियावरील शुभेच्छा आणि सेल्फी हे आजच्या काळाचे वास्तव आहे. फटाक्यांच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर परिणाम होत आहे. पण याच काळात पर्यावरणपूरक दिवाळीची चळवळही सुरू झाली आहे. मातीचे दिवे विकत घेऊन कारागिरांना मदत करणे, फटाक्यांऐवजी दिवे आणि फुलांनी सजावट करणे, प्लॅस्टिकमुक्त सण साजरा करणे. या चांगल्या गोष्टी नव्या युगाची सकारात्मक दिशा दाखवत आहेत.

खरं तर जुन्या आणि नव्या दिवाळीतला फरक बाह्य स्वरूपात आहे; सार्थकता मात्र तीच आहे. जुन्या काळातील साधेपणात आत्मिक समाधान होतं, तर आजच्या आधुनिकतेत सोयी आहेत. जर आपण त्या दोघांचा समतोल साधला, तर दिवाळी अधिक अर्थपूर्ण ठरू शकते. दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे अंत:करणातील अंधार दूर करून मनात सत्य, प्रेम, करुणा आणि सद्भावनेचा प्रकाश पेटवणे.

आज आपण आधुनिक साधनांचा वापर करत असलो, तरी परंपरेचा दीप जिवंत ठेवणं गरजेचं आहे. मुलांना या सणाची उत्पत्ती, परंपरा आणि सांस्कृतिक मूल्ये समजावून सांगणं आवश्यक आहे. घराघरात मातीचे दिवे लावले गेले, रांगोळ्या काढल्या, गोडधोड वाटले गेले आणि सण एकत्र साजरा केला गेला, तर दिवाळी पुन्हा मनामनात उजळेल. दिवाळी हा केवळ सण नाही, तर संस्कृतीचा शाश्वत दीप आहे. आनंद, प्रकाश आणि संस्कारांचा तेजस्वी संगम आहे.

एकंदरीत, दिवाळी किंवा दीपावली हा प्रकाशाचा सण फक्त धार्मिक नसून सांस्कृतिक आणि सामाजिक उत्सव म्हणूनही प्राचीन काळापासून साजरा केला जातो. दिवाळीचा प्रकाश बाहेरच नव्हे, तर मनातही पेटायला हवा. जेव्हा आपण मनातील लोभ, मत्सर, अहंकार दूर करून ज्ञान, प्रेम, श्रद्धा आणि मैत्रीचा दीपप्रज्वलित करतो, तेव्हाच दिवाळीचा खरा अर्थ साकार होतो. अशा अंत:करणी उजेडातच खरी शुभ दीपावली फुलते.

# कार्यक्षमता व संदेश

गुजरातमधील भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळात करण्यात आलेले फेरबदल चर्चेचा विषय ठरले. राज्यात प्रदीर्घ काळ मुख्यमंत्रिपद सांभाळणारे आणि देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांचे धक्कातंत्र कायम ठेवले. अर्थात, गुजरातमधील घडामोड हे धक्कातंत्र आहेच; मात्र केवळ तेवढेच नाही. गुजरातमध्ये त्यांनी जे काही केले त्यात कार्यक्षमतेला प्राधान्य दिले जाईल या संदेशासोबतच पक्षाच्या निष्ठावानांना संधी नाकारली जाणार नाही, हाही संदेश त्यांनी दिला. गेल्या काही काळापासून भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळात खांदेपालट होणार अशी चर्चा होतीच.

काही जुन्या चेहर्‍यांना वगळून नव्यांना संधी दिली जाईल, अशी वंदता होती. तथापि, इतक्या सरसकटपणे भाकरी फिरवली जाण्याची अपेक्षा नव्हती. अनेकांचा पत्ता कट झाला असून नव्यांना संधी दिली गेली आहे. दिवाळीच्या शुभमुहुर्तावर हे सगळे घडले. काहींची दिवाळी गोड झाली तर काहींची कडू असे म्हणता येऊ शकते. मात्र, ते म्हणायचीही या मंत्र्यांना सोय नाही. कारण, ज्यांचा पत्ता कट झाला आहे त्यांना आत्मपरीक्षण करायला लावणारी त्यांची एक्झिट आहे. त्याचसोबत ज्यांची एन्ट्री झाली आहे त्यांनाही 'काम दाखवा' असा थेट इशारा आहे. सोबतच या बदलात एक वैशिष्ट्य लक्षवेधी ठरले आहे.

ते म्हणजे भूपेंद्र पटेल हे गुजरातमधील सगळ्यांत प्रभावी असलेल्या पाटीदार समाजाचे नेते आहेत. त्यांना भाजप हायकमांडने डिस्टर्ब केले नाही. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे भूपेंद्र पटेल जेव्हा मुख्यमंत्री व्हायचे होते त्या अगोदरच्या काळात पाटीदार समाज त्यांना सत्तेत योग्य प्रतिनिधित्व मिळावे, राज्याचे मुख्यमंत्रिपद मिळावे यासाठी विशेष आक्रमक झाला होता. आपल्या काही मागण्यांसाठी पाटीदार समाजातील तरुणांचे भले मोठे आंदोलन त्या काळात आता भारतीय जनता पार्टीचे आमदार असलेल्या हार्दिक पटेल यांच्या नेतृत्वाखाली झाले होते. सरकारला धडकी भरावी असेच ते आंदोलन होते.

भाजप श्रेष्ठी त्यामुळे डळमळीत झाले नाहीत. उलट कोणाच्याही गावी नसलेल्या विजय रूपाणी या अल्पसंख्य समुदायातील अर्थात जैन नेत्याला त्यांनी राज्याची धुरा सोपवली आणि पाटीदार समाजाचे नितीन पटेल यांना उपमुख्यमंत्री केले. आता अगदी त्याच्या विरूद्ध कृती भाजपने केली आहे. आता पाटीदार मुख्यमंत्री आहे आणि हर्ष संघवी नावाची अल्पसंख्याक समुदायातील व्यक्ती राज्याची उपमुख्यमंत्री आहे. संघवी यांच्या नियुक्तीमागे प्रादेशिक समतोल आणि सामाजिक संतुलन राखण्याचा प्रयत्न केला गेला असण्याची शक्यता आहे.

मात्र, संघवींच्या बढतीमागे ते एकमेव कारण नाही. त्यांची कार्यक्षमता निर्णायक ठरली आहे. मोदी आणि शहा यांच्या गुजरातमधून अलीकडच्या काळात गुजरातबाहेर तिसरे नाव ऐकू यायचे ते केवळ भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष सी. आर. पाटील यांचे. भूपेंद्र पटेल यांच्यापेक्षाही पाटलांची गुजरातबाहेर जास्त चर्चा होती. आताच्या काळात संघवी यांनी चांगले स्थान माध्यमांमध्ये मिळवले होते. वयाच्या जेमतेम चाळीशीत पोहोचलेले हर्ष संघवी त्वरित निर्णय घेण्यासाठी आणि त्यांची धडक अंमलबजावणी करण्यासाठी ओळखले जातात.गुजरातचा आणखी एक इतिहास आहे. साधारण तीन दशके आता येथे भाजपची सत्ता आहे.

## थोडक्यात

### श्री.राजेश पाटील (आयएएस यांनी ताड्यात स्वत:च्या घरी उभारली अभ्यासिका



कासोदा– प्रशासकीय कार्याची पावती म्हणून पंतप्रधान पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्काराने राजेश पाटील सन्मानित आहेत.  आपल्या ताई, मी कलेक्टर व्हयनूया प्रेरक आत्मकथेतून लाखो तरुणांना त्यांनी दिशा दिलेली आहे.

जळगाव जिल्ह्यांतील एरंडोल तालुक्यांत ताडे या गावातून आपला जीवन प्रवास त्यांनी सुरू केला. ग्रामीण भागात लोकांची घरं लहान असतात. तसेच अभ्यासासाठी योग्य प्रेरक वातावरण नसते.विजेची समस्या तर खूपच मोठी. खेड्यात राहून स्वत:ला अभ्यासासाठी झालेला त्रास आपल्या भावंडांना नको,ही भावना मनात ठेवून श्री.राजेश पाटील यांनी यंदाच्या दिवाळीच्या मुहूर्तावर गावातल्या विद्यार्थ्यांसाठी स्वखर्चाने आपल्याच घरी अभ्यासिका आणि ग्रंथालय उभारले आहे. आपल्या आई वडिलांच्या हातून नारळ वाढवून साधेपणाने या अभ्यासिकेला अर्पण केले. आपल्या कासोदा गावांसाठी ओमसाईराम पोलीस मित्र गृप देखिल अभ्यासिका व ग्रंथालय उभारून आपल्या गावांतील तरुणांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोठी जबाबदारी पार पाडत आहे.....हे देखिल आपल्यासाठी अभिमानास्पद आहेच.

### वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह २० दिवसांनी दोनगाव शिवारात सापडला

जळगाव ( प्रतिनिधी ) – शहरातील निमखेडी शिवारात रेल्वे पुलाजवळ तसेच बांभोरीच्या दिशेने असणाऱ्या गिरणा नदीमध्ये शुक्रवार दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास देवीमातेच्या मूर्तीचे विसर्जन करण्यास गेलेला तरुण वाहून गेल्याची धक्कादायक घटना उघड झाली होती. तरुणाचा मृतदेह मिळून आला नव्हता. अखेर गुरुवारी दि. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता आढळून आला आहे. पाळधी दूरक्षेत्र पोलीस स्टेशनला नोंद करण्यात आली आहे.हेमेश संतोष पाटील (वय १८, रा.मयुरेश्वर कॉलनी, दादावाडी परिसर, जळगाव) असे मयत  झालेल्या तरुणाचे नाव आहे. आई आणि जुळ्या भावासह तो राहत होता. दरम्यान शुक्रवारी दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी साडेअकरा वाजता निमखेडी रेल्वे पुलाजवळ हेमेश मित्रांसोबत विसर्जन करण्यासाठी निघाला होता.

दुपारी १२ वाजता रेल्वे पुलाजवळ हेमेश पाटील याने देवी मातेच्या मूर्तीचे विसर्जन केले. त्यानंतर पाय घसरून तो नदीपात्रात वाहून गेला होता.महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती.त्या ठिकाणी त्यांनी बचाव कार्य सुरू केले होते. मात्र तो मिळून आला नव्हता.

अखेर २० दिवसांनी दि. २३ रोजी पाळधीजवळ दोनगांव शिवारात गिरणा नदीकाठी तरुणाचा मृतदेह गुरे चारणाऱ्या व्यक्तींना आढळून आला. पाळधी पोलिसांना माहिती दिल्यावर त्यांनी मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविला. याठिकाणी रुग्णालयात कुटुंबीयांनी एकच आक्रोश केला. घटनेची पाळधी पोलिसांत नोंद करण्यात आली आहे.

## गुरे चोरणारे जळगावचे आरोपी बेड्यांसह पोलिसांच्या वाहनातून पळाले ; अंधाराचा घेतला फायदा : अमळनेर तालुक्यात कुऱ्हेजवळ घटना

अमळनेर (प्रतिनिधी) : जामनेर तालुक्यातील पहुर व अमळनेर तालुक्यातून गुरे चोरणाऱ्या जळगावच्या संशयित आरोपीना अमळनेर येथे आणत असताना २ आरोपी बेडयांसह पोलिसांच्या वाहनातून उतरून फरार झाल्याची घटना दि. २२ रोजी रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास कुऱ्हे अंडरपास बोगद्यात घडली. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

तालुक्यातून लोणे आणि पिंपळे येथून ७ गुरे चोरी झाली होती. त्याचा शोध एलसीबीचे संदीप पाटील, प्रवीण मांडोळे, हरीलाल पाटील, राहुल कोळी करीत असताना त्यांना सीसीटीव्ही फुटेजमध्ये जवखेडे येथे दुचाकी (एमएच १९ बीबी ५१९८)ही गुरे चोरीमध्ये दिसून आली. पोलिसांनी तांत्रिक माहितीवरून मालक शोधला असता अकील कादिर पिंजारी (रा. आझाद नगर, पिंप्राळा, जळगाव) असे समजले. पोलिसांनी त्यांना २२ रोजी दुपारी २ वाजता ताब्यात घेतले. त्याला पोलिसी खाक्या दाखवताच त्याने त्याचे साथीदार शाकीर शाह अरमान



शाह (वय ३०, रा. सुप्रीम कॉलनी, जळगाव), अमजद शेख फकीर कुरेशी (वय ३५ रा. अशोक किराणा जवळ, मेहरूण), आफताब आलम शेख रहीम (रा. नशिराबाद, जळगाव), तौसिफ शेख नबी (रा. फातिमा नगर, जळगाव) यांची नावे सांगितली.

सर्वांनी टोळीने अमळनेर तालुक्यात ७ आणि पहुर येथे ३ गुरे चोरी केल्याचे कबुल केले आणि चोरीत त्यांनी पिकअप वाहन क्रमांक (एमएच १९ सीव्ही ७१६९) वापरल्याचे सांगितले. पैकी ४ जणांना ताब्यात घेतले आणि तौसिफ शेख नबी हा घरी मिळून आला नाही. या संशयित आरोपीना स्पॉट व्हेरिफिकेशनसाठी दि. २२ रोजी रात्री शासकीय वाहनाने अमळनेर येथे आणत असताना त्यातील शाकीर शाह अरमान शाह व अमजद शेख फकीर कुरेशी याना बेड्या घालून मागच्या सीटवर बसवले होते.

अमळनेर जवळ कुऱ्हे रेल्वे अंडरपास बोगद्यात वाहन आल्यावर मागच्या सीट वरून दोघे जण उतरून पळून गेले. पोलिसांना कळताच त्यांनी आजूबाजूला शोध घेतला. मात्र आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पिकात लपून गेले. त्यामुळे ते मिळून आलेले नाही. तर उर्वरित ताब्यात असलेले दोघे आरोपीना पोलिसांनी अमळनेर पोलीस स्टेशनला जमा केले आहे. दोघा फरार आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २६२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक नामदेव बोरकर करीत आहेत.

## ८ वर्षांपूर्वीच्या सोन्याच्या अपहार प्रकरणाचा उलगडा

### आरोपीला वाराणसीमधून अटक ; तब्बल ११ लाख ९० हजारांचे सोने हस्तगत



जळगाव प्रतिनिधी : रामानंद नगर पोलिसांनी तब्बल आठ वर्षांपूर्वी झालेल्या सोन्याच्या अपहार प्रकरणाची उकल करत संशयित आरोपीला वाराणसी (उत्तर प्रदेश) येथून ताब्यात घेतले आहे. या आरोपीकडून तब्बल ११ लाख ९० हजार रुपये किमतीची १०० ग्रॅम सोन्याची लगड हस्तगत करण्यात आली असून, पोलिसांनी उत्कृष्ट तपास कौशल्याचे प्रदर्शन केले आहे.

दि. ३० मार्च २०१७ रोजी फिर्यादी सचिन वसंतराव भामरे (रा. आर.एल. कॉलनी, गांधी नगर, जळगाव) यांचे पिंप्राळा परिसरातील सोमाणी मार्केटमधील साई ज्वेलर्स या दुकानात काम करणारा सुशांत सुनिल कुंडु (वय ३९, रा. नस्कर पारा, संत्रागाछी, जि. हावडा, पश्चिम बंगाल) या कामगाराने दागिने बनविण्यासाठी दिलेले तब्बल ३० तोळे सोनं अपहार करून मूळ गावी पसार झाला होता.

या प्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४२/२०१७ भा.दं.वि. कलम ४०८, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपीचा पश्चिम बंगाल आणि परिसरात वेळोवेळी शोध घेतला; परंतु तो अदृश्य असल्याने हा गुन्हा कायम तपासावर ठेवण्यात आला होता.

अलीकडेच सपोनि भूषण कोते यांना आरोपी वाराणसी येथे असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पथक रवाना करण्यात आले. त्या पथकाने संशयित सुशांत सुनिल कुंडु यास वाराणसी, उत्तर प्रदेश येथून अटक करून जळगाव येथे आणले. दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यास औपचारिक अटक दाखल करण्यात आली.सपोनि भूषण कोते यांनी तपास पुढे चालू ठेवत आरोपीकडून कलकत्ता, पश्चिम बंगाल येथून अपहार केलेले ११ लाख ९० हजार किंमतीचे १०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले.

या यशस्वी कारवाईत पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि भूषण कोते, पोलीस हवालदार जितेंद्र राजपूत, पोलीस नाईक योगेश बारी, अतुल चौधरी, पोशि अनिल सोननी आणि दिपक वंजारी यांनी विशेष मेहनत घेतली.

वरिष्ठ पोलीस अधिकारी पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक श

अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

रामानंद नगर पोलिसांच्या या कौतुकास्पद तपासामुळे आठ वर्षांपूर्वीचा जुना गुन्हा उकल झाली ,असून, जळगाव पोलिस दलाने पुन्हा एकदा तपासातील चातुर्य आणि तत्परतेचे दर्शन घडवले आहे.

## फटाके फोडण्याच्या कारणावरून दांपत्यासह दोघांवर धारदार शस्त्राने वार, चौघांवर गुन्हे दाखल !

जळगाव (प्रतिनिधी) :– तालुक्यातील शिरसोली प्र. बो. येथील पाण्याच्या टाकीजवळ फटाके फोडण्याच्या कारणावरून दांपत्याला चौघांनी शिवीगाळ करून जबर मारहाण केली. तसेच धारदार चॉपरने चेहऱ्यावर वार करून गंभीर जखमी केले. भांडण सोडवण्यास आले असता दोन इसमांनादेखील धारदार शस्त्राने मारून संशयित आरोपींनी दुखापत केली आहे. याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

छाया मुकेश पाटील (वय २९, रा. शिरसोली ता. जळगाव) यांनी फिर्याद दिली आहे. मंगळवार दि. २१ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास फटाके फोडण्याच्या कारणावरून त्यांच्या घरासमोर संशयित आरोपी ज्ञानेश्वर युवराज पाटील, खुशाल माना बारी, बापू मिस्तरी, अमोल बंडू पवार (सर्व रा. शिरसोली) यांनी फिर्यादीचे पती मुकेश अशोक पाटील (वय ३४) यांना जबर मारहाण करून शिवीगाळ करत  जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच कैलास मिस्त्री याने त्याच्या हातातील धारदार चॉपरने चेहऱ्यावर मारून चेहऱ्याचे विद्रूपीकरण केले. फिर्यादी छाया पाटील भांडण सोडवण्यास आले असता त्यांनाही संशयित आरोपींनी मारहाण करून शिवीगाळ केली.

तसेच छाया पाटील यांच्या उजव्या हाताच्या पंजाजवळ हत्याराने मारून दुखापत केली. भांडण सोडवण्यास आलेले गोरक्ष शरद पाटील यांच्या डाव्या मांडीवर मागच्या बाजूला तर गगन माधव चव्हाण यांच्या डाव्या हाताला संशयित आरोपींनी धारदार शस्त्राने मारून दुखापत केली आहे. याबाबत छाया मुकेश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रेड पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र उगले करीत आहेत.

## यावल नगरपालिकेच्या रणसंग्रामात काँग्रेसचा दमदार दावा!

## प्रभाग क्र. ४ मधून लता अनिल जंजाळे दाखल करणार उमेदवारी

उपसंपादक : मिलिंद जंजाळे

यावल नगरपालिकेच्या येऊ घातलेल्या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, यंदाची निवडणूक चुरशीची ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

या राजकीय वातावरणात काँग्रेस पक्षाने आपली ताकद दाखवण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. यावल तालुका काँग्रेसचे सरचिटणीस अनिल नीलकंठ जंजाळे यांच्या पत्नी सौ. लता अनिल जंजाळे या प्रभाग क्रमांक ४ मधील अनुसूचित जाती



महिला राखीव जागेवरून काँग्रेसच्या उमेदवार म्हणून आपली उमेदवारी दाखल करणार आहेत.

लता जंजाळे यांच्या उमेदवारीमुळे या प्रभागातील निवडणूक रंगतदार होणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. लता जंजाळे या सामाजिक कार्यात सक्रिय असून, आपल्या परिसरातील महिला सक्षमीकरण, स्वच्छता, शिक्षण व नागरी विकास या क्षेत्रात त्यांनी विशेष योगदान दिले आहे.

त्यांच्या पती अनिल जंजाळे हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असून, गेल्या अनेक वर्षांपासून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी व नागरिकांच्या प्रश्नांसाठी लढा देत आले आहेत.

काँग्रेसच्या गड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यावल तालुक्यात, जंजाळे दांपत्याच्या कार्यामुळे अनेक युवक पक्षाशी जोडले गेले आहेत.

लता जंजाळे यांच्या उमेदवारीमुळे पक्षाच्या महिला शाखेलाही मोठा ऊर्जावान आधार मिळणार आहे.

या उमेदवारीनंतर यावल नगरपालिकेतील राजकीय समीकरणे नव्याने मांडली जाण्याची शक्यता व्यक्त होत असून, काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागरिकांचा विश्वास, विकासाचं ध्येय – यावलसाठी काँग्रेसचं नवं नेतृत्व! अशा घोषवाक्यांसह लता जंजाळे यांचा प्रचार लवकरच सुरू होणार आहे.

## बेवारसांचे झाले वारस : कर्मचाऱ्यांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी अंघोळ घालून दिल्या भेटवस्तू !

जळगाव (प्रतिनिधी) :– ऐन दिवाळी सणात बेवारस रुग्णांना एकटेपणाची भावना वाटू नये, कुटुंबीयांची आठवण येऊ नये म्हणून येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील कक्ष क्रमांक १३ येथे बेवारस रुग्णांची स्वच्छता करून कर्मचाऱ्यांसह सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासली. या कृतीचे अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर यांचेसह उप अधिष्ठाता डॉ. मारोती पोटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. धर्मेंद्र पाटील, अतिरिक्त वैद्यकीय अधीक्षक डॉ. इम्रान पठाण यांनी कौतुक केले आहे.



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात अनेक बेवारस रुग्णांवर उपचार करण्यात येतात. त्यांचे नातेवाईक शोधण्यासाठी रुग्णालयातील समाजसेवा विभाग आणि कर्तव्यावरील पोलीस काम करीत असतात. या बेवारसांना वेळेवर भोजन, औषध देण्याचे काम कक्षातील परिचर्या वर्ग व कर्मचारी करतात. दरम्यान, रुग्णालयात बेवारसांसाठी काम करणारे कर्मचारी इसाक बागवान, दानिश बागवान यांनी उमर बागवान यांना सामाजिक कार्यकर्ते साजिद शेख यांच्या सहकार्याने सोबत घेऊन कक्ष क्रमांक १३ येथे जाऊन सर्व बेवारस रुग्णांची अंघोळ घालून त्यांना आपलेपणाची भावना दिली.

तसेच, दिवाळीनिमित्त भेटवस्तू देऊन सन्मानित केले. या सेवेमुळे रुग्ण भारावून गेले होते. सामाजिक बांधिलकीच्या या कृतीचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, उप अधिष्ठाता डॉ. मारोती पोटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. धर्मेंद्र पाटील, अतिरिक्त वैद्यकीय अधीक्षक डॉ. इम्रान पठाण, अधिसेविका संगीता शिंदे आदींनी कौतुक केले आहे.

## थोडक्यात

### चिखल लोटल्याच्या कारणावरून कुटुंबीयांची दोघ तरुणांना मारहाण !

जळगाव (प्रतिनिधी) :- शहरातील गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या समोर समर्थ नगरात घरासमोर चिखल लोटल्याच्या कारणावरून एका कुटुंबीयांनी दोन तरुणांना चापतबुक्क्यांनी तसेच लाकडी काठीने मारहाण करून जबर दुखापत केली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश सुखदेव भुसारे (वय ४७, रा. समर्थ नगर, गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयसमोर, जळगाव) असे फिर्यादी व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी दि. २१ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी दुपारी ४ वाजेच्या सुमारास सुरेश भुसारे हे त्यांची पत्नी लताबाई यांचेसह घरी असताना त्यांची मुले हेमंत व प्रशांत भुसारे हे फटाके घेऊन घरी आले. त्यावेळेला भुसारे यांच्या घरासमोर राहणारे सुनीताबाई सावंत या रस्त्यावरील चिखल भुसारे यांच्या घराकडे लोटत होत्या. याबाबत हेमंत यांनी चिखल आमच्या घराकडे लोटू नका असे सांगितले. त्याचा राग आल्याने सुनीताबाई सावंत यांचे पती प्रमोद सावंत, मुले भावेश प्रमोद सावंत, कल्पेश प्रमोद सावंत अशांनी भुसारे यांची मुले हेमंत व प्रशांत यांना शिवीगाळ व चापटाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच प्रशांत याच्या डोक्यात कल्पेश याने लाकडी काठीने मारहाण करून जबर दुखापत केली. या प्रकरणी सुरेश भुसारे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल चंद्रकांत पाटील करीत आहेत.

### तरुणाच्या पोटात चॉपर मारून केले गंभीर जखमी, दुसरा बचावला !

पाचोरा (प्रतिनिधी) :- शहरातील संभाजी चौकात मंगळवारी दि. २१ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकरा वाजता सुमारास एका तरुणाने किरकोळ कारणावरून २ तरुणांवर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यात एका तरुणाच्या पोटात चॉपर मारून गंभीर जखमी केले आहे तर दुसऱ्याच्या मानेवर चॉपर मारण्याचा प्रयत्न करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पाचोरा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत जखमी यश अनिल पाटील (वय २० वर्षे रा. देशमुख वाडी, पाचोरा) यांनी फिर्याद दिली आहे. पाचोरा शहरात संभाजी चौकात यश पाटील हा मयूर विनोद भोई (वय २० रा. आठवडे बाजार, पाचोरा) याच्यासोबत २१ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास फटाके फोडत होता. त्यावेळेला संशयित आरोपी शिव गोसावी (पूर्ण नाव गाव माहित नाही) हा दुचाकीवर तिथे आला. त्याने दुचाकीमधून चॉपर काढून मयूर भोई याच्या पोटात मारला. तसेच फिर्यादी यश पाटील यांच्या मानेवर चॉपर मारण्याचा प्रयत्न करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत यश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाचोरा पोलीस स्टेशनला खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार हे करीत आहेत.

### अमळनेर तालुक्यात दोघांच्या आत्महत्या ; तालुक्यात खळबळ

अमळनेर (प्रतिनिधी) – तालुक्यातील गांधली आणि फाफोरे या दोन गावांमध्ये वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन व्यक्तींनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना उघडकीस आल्या असून, या दुर्दैवी प्रकारांमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. दोन्ही प्रकरणांत अमळनेर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.पहिली घटना गांधली येथे घडली. १९ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास विजय आसाराम पाटील (वय ४५) यांनी आपल्या राहत्या घराच्या बांधकामाधीन वरच्या मजल्यावर वायरच्या सहाय्याने गळफास घेतला. त्यांच्या पत्नीला हा प्रकार लक्षात आल्यानंतर शेजाऱ्यांच्या मदतीने त्यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.दुसरी घटना फाफोरे बु येथे २० ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास घडली. लक्ष्मण पंडित शिंदे (वय ४०) यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांना नातेवाइक आणि ग्रामस्थांनी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला.दोन्ही घटनांमुळे स्थानिकांत हळहळ व्यक्त केली जात असून, आत्महत्येची कारणे समजून घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

### विजेचा धक्का बसून शेतकऱ्याचा मृत्यू; वाकी परिसरात शोककळा

बोदवड (प्रतिनिधी) – बोदवड तालुक्यातील वाकी शिवारात सोमवारी दुपारी घडलेल्या दुर्दैवी घटनेत विजेचा जबर धक्का बसून एका तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाला. ही घटना २० ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे तीन वाजता उघडकीस आली असून, याबाबत बोदवड पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.मयत तरुणाचे नाव जितेंद्र प्रल्हाद पाटील (वय ३०, रा. वाकी, ता. बोदवड) असे आहे. जितेंद्र पाटील हे शेती करून आपला उदरनिर्वाह करत होते. सोमवारी ते नेहमीप्रमाणे शेतात गेले असता विहिरीतील विद्युत पंप सुरू करण्यासाठी खांबावरील लोखंडी पेटी उघडत होते. दरम्यान अचानक विद्युत प्रवाह लागून ते जागीच कोसळले. तात्काळ त्यांना बोदवड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे वाकी गावात शोककळा पसरली असून, कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जन्मसंस्थान, श्रीक्षेत्र आपेगाव आयोजित द्वितीय राज्यस्तरीय साहित्य संमेलनाची भव्य तयारी सुरू

**स्नेहा उत्तम मडावी पुणे**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पावन जन्मभूमीवर साहित्य, संतवाङ्मय आणि संस्कृतीचा सोहळा रंगणार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जन्मसंस्थानच्या वतीने आयोजित द्वितीय राज्यस्तरीय साहित्य संमेलन बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी आपेगाव येथे भव्य उत्साहात पार पडणार आहे. या संमेलनाचे उद्घाटन जेष्ठ साहित्यिका डॉ. ऊर्मिला चाकूरकर यांच्या हस्ते होणार असून, या संमेलनाचे अध्यक्षस्थान हास्यकवी संजय कावरे भूषविणार आहेत. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून संतपरंपरेचे तेजस्वी प्रतिनिधी आध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर हे असणार आहेत. या संमेलनाचे आयोजन लोककवी विजय पोहनेरकर, कवयित्री अलका बोर्डे, चित्रकार अरविंद शेलार, उद्योजक शांताराम गायकवाड आणि लेखक संदीप राक्षे यांनी केले आहे. आपेगावातील संतभूमीवर या मंडळींनी साहित्य आणि भक्तीचा सुंदर संगम घडवण्याचा संकल्प केला आहे. संपूर्ण दिवसभर विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे. सकाळी ज्ञानदीप प्रज्वलन करून संमेलनाची मंगल सुरुवात होईल. या नंतर ज्ञानरत्न पुरस्कार वितरण सोहळा! होणार आहे, 'हासू आणि आसू' हास्य कवितांचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमा नंतर होणाऱ्या कवी संमेलनात महाराष्ट्रभरातील युवा आणि ख्यातनाम कवी/ कवयित्री सहभागी होणार आहेत. दुपारी होणाऱ्या 'साहित्यिक संवाद आणि मुलाखत' या सत्रात आध्यात्म विवेकी ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांची प्रकट मुलाखत होणार आहे. सायंकाळी भजनसम्राट सदानंद मगर यांच्या भजन संध्येद्वारे संमेलनाला भक्तिभावाचा रंग लाभेल. शेवटी दीपोत्सवाने (संतज्ञानदीप प्रज्वलन



समारंभ) संतभूमी उजळणार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जन्मसंस्थान श्रीक्षेत्र आपेगाव यांच्या वतीने खालील साहित्यिकांना 'ज्ञानरत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. ज्ञानरत्न पुरस्कार:- लेखक, ह.भ.प हरिभाऊ शिंदे, यवतमाळ. कवयित्री वंदना जायले, अकोला. कवी गणेश सांगुनवेढे, संग्रामपूर. हास्यकवी नितीन वरणकार, शेगाव. लेखक संजय गोराडे, नाशिक. कवी ज्ञानेश्वर शिळवणे, चाकण. कवयित्री अलका सपकाळ, भूम. कवयित्री शालिनी सहारे, पुणे. कवयित्री शैलजा करोडे, मुंबई. कवी जे. डी. भुसारे, मुंबई. कवी डॉ. प्रभाकर शेळके, जालना. लेखक दिगंबर ढोकले, भोसरी. कवी देवेंद्र इंगळकर, पनवेल. कवी धोंडिराम राजपूत, वैजापूर. कवी निवृत्ती कानवडे, संगमनेर. कवी पेंटर देशमुख, शेगाव. कवी मधुकर गिलबिले, चाकण. कवी लक्ष्मण हेंबाडे, मंगळवेढा. कवी सुदर्शन टोपरे, अंजनगाव सुर्जी. कवी हरिदास कोष्टी. लेखक डॉ. सतिश पाटील, नाशिक. कवयित्री पूजा बागुल, नाशिक. सूत्रसंचालक रविंद्र मगर, संभाजी नगर. गझलकार राम गायकवाड. कवी संतोष साळुंके, आळंदी. कवी अमोल चरडे, पुणे, कवी बबनराव धुमाळ, वाघोली. कवी प्रमोद काकडे, अमरावती. माऊली मुळे, आपेगाव. कवी विलास पुंडले, पनवेल. कवी सुदर्शन धस, अहिल्यानगर. कवी संतोष गाढवे, खेड. कवी राजेंद्र उगले, नाशिक. कवी प्रवीण बोपुलकर, पनवेल. कवी डॉ. राम शिंदे, मुंबई. कवी रवींद्र काळे, मुंबई, कवी विलास पंचभाई, नाशिक. कवी प्रशांत केंदळे, नाशिक. सूत्रसंचालक रविंद्र मालुंजकर, नाशिक. गीतकार सोमनाथ पगार, नाशिक. कवयित्री निशा कापडे, संभाजी नगर, कवी किरण भावसार, नाशिक. कवयित्री प्रतिभा खैरनार, नांदगाव. कवयित्री डॉ. अंजना भंडारी. कवयित्री छाया जायभाये, जालना. कवयित्री अलकनंदा आंधळे, संभाजी नगर. कवयित्री जयश्री गीते, शेगाव. कवयित्री अलका अमृतकर, नाशिक. कवयित्री सुजाता येवले, नाशिक. कवी सागर जाधव जोपूळकर, चांदवड. कवयित्री स्नेहल येवला, ठाणे. कवी विशाल कुलट, अकोला. कवयित्री संध्याराणी कोल्हे, धाराशीव. कवी विशाल टर्ले, नाशिक. गायिका वैष्णवी सदानंद मगर, संभाजी नगर. कवयित्री शालिनी बेलसरे, अमरावती. कवी हरिदास आखरे, शेगाव. विनायक भारंबे, शेगाव.

ज्ञानेश्वर महाराजांच्या पवित्र मातीत होणारे हे संमेलन केवळ साहित्यिकांची मेजवानी नसून, ज्ञान, भक्ती आणि संस्कृतीचा एकत्र उत्सव होणार आहे. संमेलनाच्या आयोजन समितीने सांगितले की, संतसाहित्य आजही समाजाला दिशा देते. आपेगाव हे संत ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव, संत मुक्ताई यांचे पवित्र जन्मस्थान असून, या भूमीत साहित्याचा मेळा भरविणे म्हणजे संतपरंपरेला वंदन करण्यासारखे आहे. हे संमेलन हे केवळ शब्दांचे नव्हे, तर विचार आणि संस्कारांचा महायज्ञ ठरणार आहे

# पाचोऱ्यात किरकोळ कारणावरून २ तरूणांवर चॉपरने प्राणघातक हल्ला

## ऐन दिवाळीत पाचोऱ्यात वार

**पाचोरा प्रतिनिधी शेख जावीद )**

पाचोरा शहरातील छत्रपती संभाजी राजे चौकात मंगळवारी दि २१ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकरा वाजता सुमारास एका तरुणाने किरकोळ कारणावरून २ तरुणांवर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. यात एका तरुणाच्या पोटात चॉपर मारून गंभीर जखमी केले आहे तर दुसऱ्याच्या मानेवर चॉपर मारण्याचा प्रयत्न करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला या प्रकरणी




पाचोरा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे सविस्तर माहितीवरून जखमी यश अनिल पाटील (वय २० वर्षे रा. देशमुख वाडी पाचोरा) यांनी फिर्याद दिली आहे. पाचोरा शहरात संभाजी चौकात यश पाटील हा मयूर विनोद भोई (वय २० रा. आठवडे बाजार, पाचोरा) याच्यासोबत २१ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास फटाके फोडत होता. त्यावेळेला संशयित आरोपी शिव गोसावी (पूर्ण नाव गाव माहित नाही) हा दुचाकीवर तिथे आला. त्याने दुचाकीमधून चॉपर काढून मयूर भोई याच्या पोटात मारला. तसेच फिर्यादी यश पाटील यांच्या मानेवर चॉपर मारण्याचा प्रयत्न करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत यश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून पुढील तपास स्थानिक पोलीस करीत आहेत.

## माजी ग्रा.पं.सदस्य जनर्दन कोळी यांचे निधन

**उपसंपादक : मिलिंद जंजाळे**

यावल तालुक्यातील किनगाव ग्रामपंचायतीतील ज्येष्ठ समाजसेवक, माजी ग्रामपंचायत सदस्य जनार्दन राजधार कोळी (जना आप्पा) वय ७४ यांचे गुरुवार, दिनांक २३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी सुमारे ४.३० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनाने किनगाव तसेच संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. जनार्दन (जना आप्पा) कोळी हे अत्यंत मनमिळाऊ, लोकाभिमुख व समाजहितचिंतक व्यक्तिमत्व होते. त्यांनी ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्य करताना ग्रामविकासासाठी अनेक लक्षणीय कामे केली. त्यांच्या कार्यकाळात किनगावच्या विकासाचा वेग वाढविण्यात त्यांनी मोठी भूमिका बजावली. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. सुशीलाबाई कोळी यांचे पती, तसेच यावल कृषी



उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती बबलू कोळी, हर्षल कोळी व मिलिंद कोळी यांचे वडील होत. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवारी (२४ ऑक्टोबर) सकाळी १० वाजता किनगाव येथील राहत्या घरून निघणार असून, गावातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने समाजातील एक ज्येष्ठ, अनुभवी आणि जनतेच्या मनात स्थान मिळवलेला लोकसेवक हरपला आहे. गावातील तसेच परिसरातील नागरिकांकडून त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.

# पाचोरातील महिलेचे एटीएम फसवणूक प्रकरण;

# ३.१९ लाखांची फसवणूक; पोलिस कर्मचारी शरद पाटील यांनी तांत्रिक बाबींचा वापर करत आरोपीला केले नागपुरातून अटक

**पाचोरा प्रतिनिधी शेख जावीद**

पाचोरा येथे एक धक्कादायक फसवणुकीची घटना उघडकीस आली आहे. जिथे फिर्यादीच्या बँक खात्यातून तब्बल ३,१९,५१६/- (रु. ३ लाख १९ हजार ५१६) रुपये अवैधरित्या काढून घेण्यात आले होते. या प्रकरणी पाचोरा पोलिसांनी तांत्रिक तपास व कौशल्याचा वापर करून आरोपीला नागपूर येथून अटक केली आहे. याबाबत पाचोरा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर नंबर १९७/२०२५, भादंवि कलम ४२० (फसवणूक) अंतर्गत स्वीटी योगेश संघवी (वय ३८, रा. उत्राण, ता. एरंडोल, ह.मु. संघवी कॉलनी, पचोरा) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात विशाल दीपक गायकवाड (वय २५, धंदा- लॅपटॉप रिपेरिंग, रा. फ्लॅट नंबर ७०२, सातवा मजला, अमर पॅलेस, धंतोली, नागपूर गुन्ह्याची थोडक्यात हकीकत फिर्यादी स्वीटी संघवी यांचा एच.डी.एफ. सी. बँकेचा खाते क्रमांक २१३६१०००००२५३८ होता, ज्याला त्यांचा मोबाईल नंबर ७८८८२१३२३८




लिंक होता. हा मोबाईल नंबर नंतर मोबाईल कंपनीने आरोपी विशाल गायकवाड याला दिला होता. फिर्यादीचे बँकेचे चेक बुक व एटीएम कार्ड कुरिअर कंपनीकडून डिलीव्हरीसाठी आले असताना, कुरिअर कंपनीने या नंबरवर फोन केला. आरोपी विशाल गायकवाड याने मुद्दाम खोटे बोलून हे पार्सल नागपूर येथील त्याच्या घराच्या पत्त्यावर मागवले पार्सल स्वीकारल्यानंतर आरोपीने त्यातील एटीएम कार्डचा पिन सेट केला. त्यानंतर २१/०३/२०२३ ते २४/०३/२०२३ या कालावधीत वेगवेगळ्या ठिकाणाहून फिर्यादीच्या बँक खात्यातून अवैधरित्या एकूण रु. ३,१९,५१६/- रुपये काढून फसवणूक केली आहे. सदर घटनेबाबत २०२३ मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला होता.पोलिसांची कारवाई या गंभीर गुन्ह्याचा तपास करताना, पोलीस कॉन्स्टेबल १४२२ शरद पाटील यांनी आपले कौशल्य वापरले. त्यांनी तांत्रिक बाबींचा आधार घेत आरोपीचा शोध घेतला. अखेरीस पोलिस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोउनि. कैलास ठाकूर यांच्या मदतीने त्यांनी आरोपी विशाल दिपक गायकवाड याला नागपूर येथून अटक केली. याबाबत पाचोरा प्रतितिधी शेख जावीद यांनी पोलिसांना अशा घटना यानंतर होऊ नये यावर विचारले असता पोलिसांनी त्याने प्रतिक्रिया देत सांगितले की,नागरिकांनी आपल्या बँक खात्याशी जोडलेले मोबाईल नंबर आणि गोपनीय माहिती याबाबत सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

हे वत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक, व मालक सुमेध पद्माकर सोनवणे यांनी रिया प्रिंटर्स, अजिंठा चौफुली, सातपुडा ऑटो जवळ, जळगाव येथे छापून स.नं. 29/अ, प्लॉट नं. 98, अजिंठा बॅकवर्ड सोसायटी, एमआयडीसी, जळगाव – 425001 येथे प्रसिद्ध केले. संपादक – सुमेध पद्माकर सोनवणे (आरएनआय नं. - MAHMAR/2023/85315)

Printed, published and Owned by Sumedh Padmakar Sonawane, and printed at Riya Printers, Ajinta Chaufuli Near Satpuda Auto Jalgaon – 425001 and published at S.No.29/A, Plot No.98, Ajintha Backword Society,MIDC, Jalgaon -425001, Editor - Sumedh Padmakar Sonawane (RNI NO. - MAHMAR/2023/85315)